IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महात्मा बसवेश्वर यांचा  मानवतावादी दृष्टीकोन

**प्रा. डॉ. दिगंबर शिवाजी वाघमारे**

विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय टेंभूर्णी, ता-माढा जि.सोलापूर

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*महात्मा, बसवेश्वर*

**ABSTRACT**

महात्मा बसवेश्वर हे मध्ययुगीन भारतातील थोर  सामाज क्रांतिकारक होते.बाराव्या शतकात श्री बसवेश्वरांनी केलेले कार्य अलौकिक असेच होते.माणसातल्या समानतेवर  नवा वीरशैव धर्म त्यांनी जनतेला दिला.बसवेश्वरांनी आपल्या वर्णाश्रम पद्धती जातिवाद,भेदाभेद,स्त्रियांवरील अत्याचाराविरुद्धात आवाज उठवला.यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाह,विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला.त्याचप्रमाणे अस्पृश्तेस विरोध केला.बसवेश्वरांच्या या कार्यामुळे नवसाहित्याच्या रचनेस सुरुवात झाली.त्यांच्या पुरोगामी धोरणामुळे समाजात समता प्रस्थापित होण्यास मदत झाली.या पंथात गुरूला महत्त्वपूर्ण स्थान आहे. या पंथांचे अनुयायी स्वतः जवळ लिंग धारण करतात म्हणून त्यांना लिंगायत असे ही म्हटले जाते.यांतील षटस्थळ सिद्धांत व पंचाचार ,अष्टवरण उ आचर धर्मास महत्वपूर्ण असे स्थान देण्यात आले. आचार्य पद्धतीस महत्व देणाऱ्या पंथाने लोकांना भक्तिमार्गाचे धोरण सामाजिक पातळीवरील परंपरेचे जोखड मोडण्यासाठी व सामाजिक समतेच्या प्रस्थापनेसाठी व्यापक भूमिका घेतली१

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 6%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Waghmare, Digambar Shivaji.** (2025). महात्मा बसवेश्वर यांचा मानवतावादी दृष्टीकोन. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **504–507.**

महात्मा बसवेश्वर हे मध्ययुगीन भारतातील थोर सामाज क्रांतिकारक होते.बाराव्या शतकात श्री बसवेश्वरांनी केलेले कार्य अलौकिक असेच होते.माणसातल्या समानतेवर नवा वीरशैव धर्म त्यांनी जनतेला दिला.बसवेश्वरांनी आपल्या वर्णाश्रम पद्धती जातिवाद,भेदाभेद,स्त्रियांवरील अत्याचाराविरुद्धात आवाज उठवला.यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाह,विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला.त्याचप्रमाणे अस्पृश्तेस विरोध केला.बसवेश्वरांच्या या कार्यामुळे नवसाहित्याच्या रचनेस सुरुवात झाली.त्यांच्या पुरोगामी धोरणामुळे समाजात समता प्रस्थापित होण्यास मदत झाली.या पंथात गुरूला महत्त्वपूर्ण स्थान आहे. या पंथांचे अनुयायी स्वतः जवळ लिंग धारण करतात म्हणून त्यांना लिंगायत असे ही म्हटले जाते.यांतील षटस्थळ सिद्धांत व पंचाचार ,अष्टवरण उ आचर धर्मास महत्वपूर्ण असे स्थान देण्यात आले. आचार्य पद्धतीस महत्व देणाऱ्या पंथाने लोकांना भक्तिमार्गाचे धोरण सामाजिक पातळीवरील परंपरेचे जोखड मोडण्यासाठी व सामाजिक समतेच्या प्रस्थापनेसाठी व्यापक भूमिका घेतली[१]

**महात्मा बसवेश्वरांची शिकवण** :

परंपरेने जन्मावरून ठरविण्यात आलेल्या जाती आणि वर्ण हे सारे खोटे आहे.म्हणून माणसामाणसांत स्पृश्य-अस्पृश्य असा कोणताही भेदाभेद करू नये.स्त्री-पुरुषांना समान वागणूक मिळावी,विधवांना सन्मानाने वागवावे आणि त्यान पुनर्विवाह करण्यास संधी द्यावी.सती जाण्याची अमानुष प्रथा बंद करावी.बालविवाह करण्यास त्यांचा पूर्ण विरोध होता.परोपजीवी असे कोणी राहू नये. प्रत्येकाने कष्ट करून आपली उपजीविका करावी.आपल्या कुटुंब पोषणासाठी आवश्यक असणारे धन ठेवून उरलेले सर्व धन समाजासाठी खर्च करावे.इष्ट लिंगाची पूजा करावी,अन्य देवदेवतांची पूजा करू नये.देवळे सुद्धा बांधू नयेत.अंधश्रद्धा बसवेश्वरांना मुळीच मान्य नव्हत्या,चमत्कारांवर त्यांचा विश्वास नव्हता.जुन्या धर्मग्रंथातले ज्ञान तेवढेच सत्य आणि अंतिम आहे.हे त्यांना मुळीच मान्य नव्हते.जुन्या सनातन ब्राह्मणवादाच्या विरोधात बसवेश्वरांनी बंड केले.माणसामाणसांत समता असावी असे प्रतिपादन करणे जर पाप असेल तर पुण्य कोणते? अशी बसवेश्वरांची रोकठोक विचारसरणी होती. मूर्ती आणि मंदिरेही बसवेश्वरांना मान्य नव्हती.पुरोहितांनी स्वतःच्या देवदेवतांची आणि देवळांची उभारणी केली असे त्यांचे परखड मत होते.लिंगायत धर्मात बसवेश्वरांनी शाकाहाराचा पुरस्कार केला आहे.त्यांनी ब्राह्मचार्यचे स्तोम माजविले नाही.धर्मप्रसारकाने लग्न करावे असा त्यांचा आदेश होता.[२] आधुनिक काळात सुरु झालेल्या समाजसुधारणा आणि प्रबोधनाच्या चळवळी अगोदर महात्मा बसवेश्वरांनी भारतीय समाजाची समतेवर आधारित पुनर्स्थापना करण्याची घेतलेली भूमिका किती तरी क्रांतिकारक वाटते. भारतीय समाजव्यवस्था हि आर्थिक शोषणावर आधारित होती.समाजातील उच्चवर्णीय निम्नवर्णीयांच्या आर्थिक शोषणातून स्वतःची सुखे उपभोगत होते.हे आर्थिक शोषण बसवेश्वरांनी अमान्य केले.प्रत्येकांनी कष्ट करावे ही त्यांची शिकवण आर्थिक समतेकडे घेऊन जाणारी आहे. बसवेश्वर कोणत्याही प्रकारचा मानत नसत.समाजामध्ये सर्वच प्रकारची समता स्थापित व्हावी यासाठी अतिशय कृतिशीलपणे त्यांनी प्रचलित धर्मश्रद्धा नाकारून लिंगायत हा पर्यायी धर्म दिला.वर्णजातीअंताच्या संघर्षामध्ये वीरशैवांची शिकवण महत्वाची आहे.

**अनुभव मंटप:**

कल्याण नगरीत बसवेश्वरांच्या प्रेरणेने एका अनुभव मंटपाची स्थापना करण्यात आली.होती.महान तत्त्वज्ञानी अल्लामप्रभू हे या मंटपाचे अध्यक्ष होते.योग्य पारख करूनच मग या अनुभव मंटपात सभासद म्हणून बसण्याचा मान दिला जाई.तेथे विविध विषयावर चर्चा होई निरनिराळ्या भागांतून आलेल्या शिवशरणानी लिहिलेली वचने वाचून दाखविण्यात येत असत आणि ती निर्दोष आहेत असे ठरले तर वीरशैवांच्या शरण साहित्यात त्या वचनांना अढळ स्थान प्राप्त होई.[३] कल्याण नगरीत असलेला अनुभव मंटप म्हणजे वीरशैव लिंगायत धर्माचे ज्ञानपीठ होते.त्याचे सदस्यत्व प्राप्त झालेले शरण मोठे कर्तृत्ववान, ज्ञानी,व्यासंगी आणि निष्ठावंत होते.अर्थातच बसवेश्वरांची प्रेरणा या संघटनेमागे होती.त्यामुळे काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंतचे विचारवंत कल्याण नगरीत चर्चा करण्यासाठी येत असत आणि तेथील वातावरणाने प्रभाववित होऊन अनुभव मंटपाचे सभासद होत असत.शिवशरण रुद्रमणी हा बसवेश्वरांचा अनुयायी कुशल संघटक होता.त्याने अत्यंत परिश्रमाने वीरशैवंची संघटना उभारली.या अनुभव मंटपाभोवती २१ हजार जंगम,१२ हजार भक्त,३ हजार विरक्त अशा धर्मप्रसाराकांचे जाळे उभे केले.संघटनेचे सभासद करून घेताना मंटपाचे अध्यक्ष अल्लमप्रभू प्रत्येकाची परीक्षा घेत असत आणि त्यांच्या कसोटीला जे उतरेल त्यांनाच तेथे स्थान देण्यात येत असे.[४] वीरशैव धर्मामध्ये प्रत्येक व्यक्तीच्या उच्च अनुभवाला अधिक महत्व दिले जात असे.माणसाचा जन्म कुठल्या जातीत झाला हे महत्वाचे नसून त्याचे अनुभव व ज्ञान अधिक महत्वाचे मानले जात असे.समाजातील प्रचलित समस्येवर चर्चा करून मार्ग निवडला जात असे. एखाद्या प्रथेविषयी चर्चा होवून तिच्यातील निरर्थकता दिसून आल्यास त्या त्यागल्या जात असत. अनुभव मंटपाचे सभासद होताना जातीचा विचार केला जात नसे.वीरशैव संप्रदायाने एकच ईश्वर मानला आणि अग्निपूजा व मूर्तीपूजा नाकारली परमेश्वर म्हणजे शिव सर्वव्यापी आहे.तो प्रत्येकाच्या देहात असतो.त्याचीच पूजा करावी पूजाविधीचे अवडंबर नको.नैवैद्य ,बळी नको,मंदिराची गरज नाही,मध्यस्थाकडून देवपूजा करू नये.हे सर्व तत्वज्ञान सत्यशोधकी आहे.त्यांच्या मते श्रम हीच पूजा,धर्मकार्यात श्रमाला स्थान दिल्यामुळे कष्ट,कर्तव्य आणि सेवेला प्रतिष्ठा मिळाली.इतर धर्म संप्रदायात भिक्षा,दान यांना महत्व आहे,पण लिंगायत संप्रदायाने भिक्षावृत्तीचा निषेध करून शिवशरनांनीही श्रम करूनच उपजीविका करावी असे सांगितले आहे.चोरी करू नका, हत्या

करू नका,द्वेष-वितंडवाद करू नका हीच अंतरंगशुद्धी आणि बहिरंगशुद्धी आहे.लिंगायत अनुयायांकडून पाप होवू नये..दंभ वाढू नये यासाठी त्यांनी ब्राह्मचर्याला विशेष महत्व दिले नाही.मद्य,मांस वर्ज्य मानून सात्विक शाकाहाराचा पुरस्कार केला.[५] वीरशैव धर्मामध्ये सत्यशोधक समाजाची बरीच तत्व दिसतात.धार्मिक क्षेत्रातील पुरोहितांनी निर्माण केलेल्या मक्तेदारीला आव्हान देण्याचे काम वीरशैव धर्माने केले.

**विविध जातीविषयी बसवेश्वरांचा समभाव**

बसवेश्वरांनी स्थापलेल्या अनुभव मंटपाचे भिन्नभिन्न जाती-धर्मातील व्यवसायिक सदस्य होते.श्री महात्मा बसवेश्वरांनी सर्व जातीवर्णाच्या स्त्री-पुरुष शिवशरणांना आपले आत्मानुभव व्यक्त करता यावे यासाठी श्री अल्लमप्रभूंच्या अध्यक्षतेखाली अनुभव मंटप या सांस्कृतिक व्यासपीठाची अध्यात्मिक धर्मसंसद स्थापन केली.यात भिन्न भाषा,प्रदेश,जाती,वर्ण,व्यवसाय असणारे लोक एकत्र बसून चर्चा करीत.या अनुभव मंटपाचा कीर्ती सुगंध सगळीकडे पसरला होता.भारतातून विशेषतः महाराष्ट्र,कुंतल,विदर्भ,चोळ,तेलंगाणा,केरळ,आंध्र,ओरिसा,सौराष्ट्र,
गुजरात,काश्मीर,गांधार,अफगाणिस्तान इत्यादी प्रदेशात अशा वार्ता पसरल्या की,कल्याण नगरात समतेचे जातीविरहित समाज व्यवस्थेचा,निखळ भक्तिभावाचा भाक्तीपीठाचा एक अभिनव प्रयोग सुरु झालेला आहे.हे केवळ भक्तीपीठच नव्हते तर समतापीठही होते.त्यात ढोर,चांभार,धोबी,न्हावी,कोळी,महार,मांग,इत्यादी दलित जाती तसेच उच्चवर्णीयांनी सहभाग घेतला.बसवेश्वर म्हणत असत की,'जो करी हत्या,तोचि मांग,अभक्ष्य खाई तोचि महार?एवढेच नव्हे,तर मांग चन्नय्याच्या गोजाचा आहे मी चांभार चन्नय्याच्या गोत्राचा आहे मी'अशा प्रकारे येथे सहभागी होणारे भिन्न-भिन्न व्यवसायिक लोक होते.त्यात व्यापारी श्रमिक सुतार,सैनिक,योगी,चोर,ब्राह्मण,न्हावी,गुराखी,मेंढपाळ,बुरुड
शिंपी इत्यादी ७०० शिवशरण पुरुष व ७० शिवशरणी स्त्रिया होत्या.[६] वीरशैव धर्माने प्रचलित जातीव्यवस्था नाकारून जातीविरहित भूमिका घेतली जे हत्या करणारे असतात,अभक्ष्य खाणारे असतात तेच तुच्छ असतात.एखाद्या निम्न जातीय व्यक्तीने योग्य वर्तन केल्यास त्याच्या जातीची ओळख बदलू शकते..अशी भूमिका वीरशैवांनी घेतल्याचे दिसून येते.उपेक्षित व कष्टकरी शूद्रांना बसवेश्वरांनी कवटाळले.त्यांचे अश्रू पुसले.महार दलितांच्या झोपडीत जावून जेवणारा महात्मा लोक प्रथमच पाहू लागले.सामाजिक कार्यात बसवेश्वर परिवाराने सेवाभावी व समर्पण वृतीने धर्म व समाजाची सेवा केली.अर्थात जातिभेदाच्या उन्मुलनाचा प्रारंभ त्यांनी स्वतःच्या घरापासून केला.उरुलिंगपेद्दी या हरिजनाला दीक्षा देऊन वीरशैव मठाचा अधिपती केले.मांग चनय्या,ढोर ककय्या आणि महार शिवनागमय्या हि हरिजन माणसे त्यांच्या सामाजिक कार्यातील मुख्य केंद्र होती,त्यांच्यावरील अस्पृश्तेचा लागलेला कलंक धुवून टाकून त्यांना सन्मानपदे बहाल करून त्यांच्याशी कौटुंबिक संबंध ठेवून त्यांच्या जीवनाला प्रगतीचा दीपस्तंभ दाखविला त्यांना या धर्मात समानतेचे तत्वानुसार एकरूप करून टाकले.अशा प्रकारे जातीनिर्मुलानाची व समतेची वैचारिक कृतीशील चळवळ सुरु करणारे मनुवादी वैदिकांच्या बुरुजावर प्रभावी हल्ले चढविणारे महात्मा बसवेश्वर हे जगाच्या मध्ययुगातील पहिले क्रांतिकारक महापुरुष होते [७] महार,मांग जातीनाही महात्मा बसवेश्वरांनी आपल्या धर्मात मानाचे स्थान दिले होते.महात्मा बसवेश्वरांनी कृतीशीलपणे अस्पृश्यता नाकारली होती.नानाविध जातीचे आणि धर्माचे स्पृश्य-अस्पृश्य या नव्या धर्माकडे आकर्षित होऊ लागले.येथे आल्यानंतर त्यांचा धर्म एकच झाला तो म्हणजे वीरशैव लिंगायत धर्म.या धर्मात येणारे कोणत्याही जाती-धर्मातून आलेले असोत,येथे समानतेच्या वागणुकीची हमी होती.वीरशैव धर्माचे अनुयायी एकत्र जेवण करीत आणि आपापसात कोणताही भेद मणी नसत.ही वीरशैव मंडळी केवळ तोंडाने समानतेचा पुरस्कार करीत असे नव्हे तर प्रत्येक्ष कृतीने ते समता आचरणात आणून दाखवीत असत.सर्व प्राणिमात्रांच्या अंतर्यामी सारखीच ज्योत तेवत असते असे ते मानीत.[८] बसवेश्वर आपल्या एका वचनात म्हणतात,ढोर ककक्या आणि मांग चन्नय्यासारख्या वडीलधाऱ्यामुळेच माझ्या जीवनाचे सार्थक झाले आहे.माझे वडील ढोर कक्क्या आणि मांग चन्नय्या यांच्या आशीर्वादानेच मी जगात आहे.[९] अस्पृश्यजातीतील माणसांना इतकी चांगली वागणूक पहिल्यादाच वीरशैवांच्या माध्यमातून मिळत होती.त्यामुळे महात्मा बसवेश्वरांच्या संरक्षणासाठी तेही उभे राहिले.प्रचलित धर्मश्रद्धा झुगारून देऊन अस्पृश्यांना आपलेसे करण्याचा बसवेश्वरांनी केलेला प्रयत्न मानवतावादी होता.जनावर कापून त्याचे कातडे कमावणारा ढोर आणि कापसाचे सुत काढून कापड तयार करणारा विणकर हे दोघेही सारखेच महत्वाचे आहेत.तसेच हातात सुईदोरा घेऊन कपडे शिवणारा शिंपी आणि ऐरणीवर ठेवलेल्या तापलेल्या लोखंडावर घणाचे आघात करून आकार देणारा लोहार इत्यादींचे श्रम मोलाचे आहेत हे बसवेश्वरांनी आवर्जून सांगितले आहे.महात्मा बसवेश्वरांनी व्यवसायावरून देण्यात येणारे हीनत्व अमान्य केले.बाराव्या शतकात श्री बसवेश्वरांनी केलेले कार्य अलौकिक असेच होते.माणसामाणसातल्या समानतेवर आधारलेला नवा वीरशैव धर्म त्यांनी जनतेला दिला.असंख्य जाती आणि पोटजाती यात विभागलेल्या समाजाला त्यांनी जागृत करून बंधुभाव निर्माण केला.संस्कृत भाषेपासून मुक्ती देऊन लोकभाषेतून जीवनाचे मौलिक तत्वज्ञान त्यांनी सांगितले.महिलांना आणि शूद्रांना सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवून दिला.[१०] वीरशैव धर्मामध्ये समतेची भाषा फक्त बोललीच जात नसे तर अतिशय कृतीशीलपणे समतेचा पुरस्कार केला जात असे.महात्मा बसवेश्वरांनी समाजातील अस्पृश्यांना अतिशय सन्मानजनक वागणूक देवून आपल्या

शिकवणूकीतून एक पर्यायी मार्ग दिला. वीरशैव धर्माने धार्मिक क्षेत्रात क्रांती केली.सामंतीक मध्ययुगीन समाजव्यवस्थेमध्ये आर्थिक शोषण सर्व स्तरावर केले जात होते.जन्मानुसार व्यवसाय हाच नियम असल्यामुळे यातून मुक्तता नव्हती.अशा काळामध्ये प्रत्येक व्यक्तीला व्यवसाय स्वातंत्र्य देवून आर्थिक शोषणाच्या व्यवस्थेला हादरे देण्याचे काम वीरशैवांनी अतिशय नेटाने केल्याचे दिसून येते.

**संदर्भ साधने :**

१. देशपांडे अ.ना.प्राचीन मराठी वाङ्:मयाचा इतिहास भाग पहिला,पृ-७८
२. मेणसे कृष्णा,श्री बसवेश्वर ते ज्ञानेश्वर एक चिंतन,लोकवाङ्मयगृह,मुंबई,पृ.६
३. तत्रैव,पृ.६
४. तत्रैव,पृ.७
५. गुंदेकर श्रीराम,सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड पहिला मुक्तरंग प्रकाशन,लातूर पृ.४६
६. मोगलेवार सुधाकर (संपादक),वीरशैव विश्वकोष,खंड-१ लेख मेनकुदळे अशोक,वीरशैव संस्कृतीचा इतिहास,आखिल भारतीय मराठी वीरशैव साहित्य मंडळ,नागपूर पृ.८६
७. तत्रैव,पृ.८५
८. मेणसे कृष्णा,श्री बसवेश्वर ते ज्ञानेश्वर एक चिंतन,लोकवाङ्मयगृह,मुंबई,पृ.१३
९. तत्रैव,पृ.१९
१०. तत्रैव,पृ.३२